नूतन कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के : पदाचा कार्यभार स्वीकारला; विद्यापीठाच्या विकासासाठी कमी पडणार नाही

# सर्व मिळून शिवाजी विद्यापीठाला पुढे नेऊया

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** मला मिळालेल्या संधीमुळे आज विद्यार्थी, शिक्षक, कर्मचारी, आदी घटकांमध्ये ते स्वत: कुलगुरु झाल्याची भावना निर्माण झाली आहे. त्याचे समाधान, आनंद वाटत आहे. कुलगुरुपदाबरोबर सन्मान, अधिकार, जबाबदारी या गोष्टीही येतात. त्यातील जबाबदारी मी काळजीपूर्वक स्वीकारत आहे. आपण सर्वांनी जबाबदारीने काम करुन शिवाजी विद्यापीठाला पुढे नेऊया, असे आवाहन नूतन कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांनी बुधवारी येथे केले.

कुलगुरु दालनात डॉ. शिर्के यांनी सायंकाळी प्रभारी कुलगुरु डॉ. नितीन करमळकर यांच्याकडून कार्यभाराच्या पत्राचे हस्तांतरण आणि ज्ञानदंड स्वीकारुन कुलगुरुपदाची सूत्रे स्वीकारली. त्यानंतर राजर्षी शाहू सभागृहातील सत्काराच्या कार्यक्रमात ते बोलत होते. माजी कुलगुरु, शिक्षक, आदींनी मला काम करण्याची संधी दिली. त्यातून मी घडत गेलो. आज मला मिळालेले कुलगुरुपद हे मला घडविणाऱ्या सर्वांना अर्पण करतो. विद्यापीठाच्या एनआरआयएफ रँकिंगच्या दृष्टीने दिशादर्शक योजना राबविल्या जातील. विद्यार्थ्यांना अधिक चांगल्या पद्धतीने शिक्षण देण्याचा माझा प्रयत्न राहणार आहे.





कोल्हापुरात बुधवारी शिवाजी विद्यापीठाचे नूतन कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांनी प्रभारी कुलगुरु डॉ. नितीन करमळकर यांच्या हस्ते ज्ञानदंड स्वीकारत कुलगुरुपदाची सूत्रे स्वीकारली. दुसऱ्या छायाचित्रात कार्यभार स्वीकारताना पत्नी सुनीता आणि मुलगी श्रद्धा उपस्थित होती.

## विद्यापीठांनी विचार करावा

ऑनलाईन शिक्षणाची साधने नसल्याने जगभरातील सुमारे ९० लाख विद्यार्थी हे शिक्षणापासून वंचित राहणार आहेत. आपल्याकडील अशा विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी उपलब्ध करुन देण्यासाठी विद्यापीठांनी एकत्रित येऊन प्रयत्न करावेत. त्यादृष्टीने विचार करावा, असे आवाहन डॉ. करमळकर यांनी केले.

## शिवरायांना अभिवादन

कुलगुरुपदाची सूत्रे स्वीकारण्यापूर्वी डॉ. शिर्के यांनी विद्यापीठाच्या प्रांगणातील छत्रपती शिवरायांच्या पुतळ्यास कुटुंबीयांसमवेत अभिवादन केले. त्यापूर्वी त्यांनी संख्याशास्त्र विभागात थांबून प्राध्यापक, विद्यार्थी, शिक्षक, आदींच्या शुभेच्छा स्वीकारल्या.

विद्यापीठाच्या विकासासाठी कोठेही कमी पडणार नाही. डॉ. करमळकर यांची अल्प कारकिर्दही संस्मरणीय ठरल्याचे कुलगुरु डॉ. शिर्के यांनी सांगितले.

पश्चिम महाराष्ट्रातील विद्यापीठांनी एकत्रित येऊन शिक्षणाचा नवा पूल बांधल्यास विद्यार्थ्यांना अनेक संधी निर्माण होतील. गरीब, वंचित विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी शिक्षकांनी सचोटीने प्रयत्न करावेत. या विद्यापीठाशी असलेले ऋणानुबंध गेल्या साडेतीन महिन्यांच्या कालावधीत अधिक वृद्धिगत झाल्याचे प्रभारी कुलगुरु डॉ. करमळकर यांनी सांगितले.

या कार्यक्रमात प्राचार्य डॉ. डी. जी. कणसे, भारती पाटील, धैर्यशील पाटील, अमित कुलकर्णी, बाबा सावंत, हेमांगी कुलकर्णी यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ. करमळकर यांचा सत्कार करुन त्यांना निरोप देण्यात आला. यावेळी डॉ. शिर्के यांच्या पत्नी सुनीता, मुलगी श्रद्धा, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, आदी उपस्थित होते. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी प्रास्ताविक केले. परीक्षा मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे यांनी आभार मानले.

## कुलगुरुंसमोर घडी बसविण्याचे आव्हान

संतोष मिठारी ।
लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील विद्यार्थी, प्राध्यापक, कुलसचिव, प्र-कुलगुरु हे टप्पे पार करीत डॉ. डी. टी. शिर्के हे कुलगुरुपदावर विराजमान झाले आहेत. त्यामुळे साहजिकच विद्यापीठाच्या विविध घटकांच्या त्यांच्याबाबतच्या अपेक्षा वाढल्या आहेत. विद्यापीठाची माहिती, तेथील कामाचा प्रदीर्घ अनुभव ही डॉ. शिर्के यांची जमेची बाजू असली, तरी सध्या कोरोनामुळे विद्यापीठाचे शैक्षणिक वेळापत्रक, प्रशासनाची घडी विस्कटली आहे. ती बसविण्याचे पहिले आव्हान त्यांच्यासमोर आहे. 'नॅक' मूल्यांकनात आघाडी घेण्याची कामगिरी त्यांना करावी लागणार आहे.

गेल्या पाच महिन्यांत विद्यापीठ प्रशासनावर काही निर्णय मागे घेण्याची नामुष्की आली. सातव्या वेतन आयोगासह अन्य मागण्यांची पूर्तता झाली नसल्याने शिक्षकेतर कर्मचाऱ्यांमध्ये असंतोष आहे. त्यांच्या मागण्यांबाबत सकारात्मक भूमिका घेत मार्ग काढावा लागणार आहे. सध्या शिक्षणाबाबत विद्यार्थ्यांमध्ये संभ्रमावस्था, भीती आहे. अशा स्थितीत आरोग्य जपून शिक्षण देण्याबाबतचा विश्वास विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करावा लागेल. विद्यापीठाने सहा वर्षांपूर्वी नॅक मूल्यांकनात 'अ' दर्जा मिळवून राज्यात आघाडी घेतली होती. 'यूजीसी'ने विद्यापीठांसाठीच्या विविध योजना, मदतीबाबत मूल्यांकनाच्या अटींमध्ये बदल केले आहेत. ते लक्षात घेता मूल्यांकनात आघाडी घ्यावी लागणार आहे.



## 'चालतंय की, असे नको'

विविध घटकांच्या अपेक्षेनुसार डॉ. शिर्के यांना कुलगुरुपदावर काम करण्याची संधी मिळाली आहे. सध्याची स्थिती पाहता विविध पातळ्यांवर विद्यापीठाला आघाडी घ्यावी लागणार आहे. त्यामुळे 'कुलगुरु आपलेच आहेत. त्यामुळे चालतयं की,' अशी भूमिका घेणे विद्यापीठाच्या घटकांनी टाळणे आवश्यक आहे.

### अन्य आव्हाने

- प्राचार्य, प्राध्यापक, कर्मचारी यांच्याशी संबंधित संघटनांशी संवाद वाढविणे.
- नव्या शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीची जबाबदारी पेलणे.
- 'एनआरआयएफ रँकिंग'कडे लक्ष द्यावे लागणार.

"योग्य व्यक्तीची कुलगुरुपदी निवड झाली आहे. माहिती घेऊन काम करण्याची डॉ. शिर्के यांची पद्धत आहे. विद्यापीठाची ओळख आंतरराष्ट्रीय पातळीवर ते अधिक ठळक करतील, असा विश्वास आहे.

- डॉ. बी. एम. हिर्डेकर, माजी परीक्षा नियंत्रक

# डॉ. डी. टी. शिर्के यांनी स्वीकारली कुलगुरूपदाची सूत्रे

## पत्रांचे हस्तांतरण, ज्ञानदंड घेऊन कार्यभार स्वीकारला

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाचे १३ वे नवनियुक्त कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी बुधवारी सायंकाळी प्रभारी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांच्याकडून कुलगुरूपदाची सूत्रे स्वीकारली.

डॉ. करमळकर यांनी डॉ. शिर्के यांचे स्वागत केले. त्यानंतर कुलगुरूंच्या दालनामध्ये नूतन कुलगुरूंकडे सूत्रे प्रदान करण्याची प्रक्रिया पार पाडली. कार्यभाराच्या पत्रांचे हस्तांतरण व ज्ञानदंड स्वीकारून डॉ. शिर्के यांनी प्रभारी कुलगुरू डॉ. करमळकर यांच्याकडून शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू म्हणून पदभार स्वीकारला. डॉ. शिर्के यांनी सायंकाळी विद्यापीठाच्या प्रांगणातील छत्रपती शिवरायांच्या पुतळ्यास अभिवादन केले. त्यांच्यासमवेत पत्नी सौ. सुनीता आणि मुलगी श्रद्धा उपस्थित होत्या.



**कोल्हापूर : प्रभारी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांच्याकडून शिवाजी विद्यापीठाचा ज्ञानदंड स्वीकारताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के.**


> शिवाजी आणि पुणे विद्यापीठात शैक्षणिक कामकाजाबाबत फारसा फरक नाही. पुणे विद्यापीठाचा कारभार मोठा असला तरी तेथे गट-गट, घेवेदेवे नाहीत. परंतु, याठिकाणी गट-तट असल्याचे जाणवेल, अशी खंत प्रभारी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी व्यवस्थापन परिषद, विद्या परिषद व अधिसभा सदस्यांसमवेतच्या अनौपचारिक गप्पावेळी व्यक्त केली.

विद्यापीठाशी संबंधित विविध घटक, प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी, महाविद्यालयांचे प्राचार्य यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवरांकडून डॉ. शिर्के यांनी शुभेच्छांचा स्वीकार केला. याप्रसंगी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक जी. आर. पळसे, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, विद्यार्थी कल्याण संचालक डॉ. आर. व्ही. गुरव यांच्यासह व्यवस्थापन परिषद, विद्यापरिषद व अधिसभा सदस्य उपस्थित होते.

डॉ. करमळकर यांनी सहकार्याबद्दल सर्वच घटकांप्रती कृतज्ञता व्यक्त केली. यावेळी विद्यापीठाचे स्मृतिचिन्ह, शिवप्रतिमा देऊन त्यांना निरोप देण्यात आला. व्यवस्थापन परिषद, विद्या परिषद व अधिसभा सदस्यांनी डॉ. करमळकर यांच्याविषयी मनोगते व्यक्त केली. यावेळी नूतन कुलगुरू डॉ. शिर्के, सौ. सुनीता शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक जी. आर. पळसे, वित्त व लेखाधिकारी व्ही.टी. पाटील उपस्थित होते.

# प्रसिद्धीपेक्षा जबाबदारी महत्त्वाची

## कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के; पदभार स्वीकारला





कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचे नूतन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी प्रभारी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांच्याकडून पदभार स्वीकारला. या वेळी डॉ. करमळकर यांनी विद्यापीठाचा ज्ञानदंड डॉ. शिर्के यांच्याकडे सोपविला.

**कोल्हापूर, ता. ७ : कुलगुरुपद अनेक दृष्टिकोनातून महत्त्वाचे आहे. या पदाबरोबर सन्मान, प्रसिद्धी येते; मात्र यापेक्षा या पदाबरोबर येणारी जबाबदारी महत्त्वाची आहे आणि ही जबाबदारी पूर्ण करण्यात मी कोठे ही कमी पडणार नाही. विद्यापीठाच्या लौकिकात भर घालण्यासाठी सर्वांना बरोबर घेऊन काम करेन, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे नूतन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.**

कुलगुरू दालनात आज प्रभारी कुलगुरु डॉ. नितीन करमळकर यांच्याकडून त्यांनी पदभार स्वीकारला. या वेळी करमळकर यांनी विद्यापीठाचा ज्ञानदंड शिर्के यांच्याकडे सोपवला. त्यानंतर विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात झालेल्या कार्यक्रमात डॉ. शिर्के बोलत होते.

कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी प्रास्ताविक केले. शिर्के यांचा स्वागतपर सत्कार तर डॉ. करमळकर यांना निरोप देण्यासाठी त्यांचा सत्कार करण्यात आला. सत्काराला उत्तर देताना कुलगुरु डॉ. शिर्के म्हणाले, ''कुलगुरुपदाबरोबर सन्मान आणि प्रसिद्धिदेखील येते; मात्र या पदाबरोबर येणारी जबाबदारीही तितकीच महत्त्वाची आहे. ही जबादारी पूर्ण क्षमतेने पूर्ण करण्यात मी कोठेही कमी पडणार नाही. सर्वांना सोबत घेऊन विद्यापीठाच्या लौकिकात भर घालण्याचा प्रयत्न करणार आहे. त्यासाठी योजना आहेतच पण लवकर त्यांची कार्यवाहीदेखील होईल.''

वित्त व लेखापाल डॉ. व्ही. टी. पाटील, परीक्षा नियंत्रक गजानन पळसे, व्यवस्थापन परिषद सदस्य प्राचार्य डी. जी. कणसे, डॉ. भारती पाटील, ॲड. धैर्यशिल पाटील, अमित कुलकर्णी, संगणकशास्त्र प्रमुख डॉ. आर. के. कामत, प्रा. डॉ. हेमांगी कुलकर्णी यांनी मनोगत व्यक्त केले. या प्रसंगी विद्यापीठातील प्राध्यापक, प्रशाकीय अधिकारी उपस्थित होते.

### पश्चिम महाराष्ट्रातील विद्यापीठांनी एकत्र यावे

प्रभारी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर म्हणाले, ''पश्चिम महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठांनी एकत्र येऊन एक व्यासपीठ बनवले पाहिजे. तिथे या विद्यापीठांमधील विद्यार्थ्यांना संशोधन, कौशल्यविकास याची संधी मिळेल. रोजगाराच्या संधीही उपलब्ध होतील.

यासाठी पुढील काही वर्षात सर्वांनी प्रयत्न करणे आवश्यक आहे. कारण एकीकडे आपण ऑनलाईन शिक्षणाची तयारी करतो आहोत; पण युनिसेफच्या अहवालानुसार कोरोना काळातील ऑनलाईन शिक्षणापासून ९४ लाख विद्यार्थी वंचित राहिले आहेत. कारण त्यांच्याकडे आवश्यक असणारी साधने नाहीत. त्यामुळे भविष्यात अशी व्यासपीठे अधिक उपयोगी ठरू शकतील.''

# कुलगुरू डॉ. शिर्के यांनी स्वीकारला पदभार

## समृध्द शैक्षणिक वारसा जपण्यासाठी प्रयत्नशील राहणार

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाचे नवनियुक्त कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी बुधवारी सायंकाळी प्रभारी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांच्याकडून कुलगुरू पदाची सूत्रे स्वीकारली. याप्रसंगी कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या पत्नी सुनिता आणि मुलगी श्रध्दा उपस्थित होत्या. कार्यभाराच्या पत्रांचे हस्तांतरण आणि ज्ञानदंड स्विकारून तेरावे कुलगुरू म्हणून पदभार स्विकारला.

शिवाजी विद्यापीठाच्या नूतन कुलगुरूंचा पदभार स्विकारल्यानंतर विविध अधिकार मंडळाचे सदस्य तसेच शिक्षण क्षेत्रातील अनेक घटकांकडून पुष्पगुच्छ देवून त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे, वित व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, विद्यार्थी कल्याण मंडळाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, डॉ. भारती पाटील, डॉ. ए. ए. गुरव, डॉ. व्ही. एन. शिंदे, व्यवस्थापन परिषद सदस्य अमित कुलकर्णी, ॲड. धैर्यशील पाटील यांच्यासह सदस्य उपस्थित होते.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचे नूतन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्याकडे विद्यापीठाची सुत्रे सुपुर्द करताना प्रभारी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर. सोबत कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, उपकुलसचिव वैभव ढेरे .**

### पदवी अंतिम सत्राच्या परीक्षेसंदर्भात बैठक

पदवी अंतिम सत्राच्या नियमित परीक्षा घेण्यासंदर्भात आज परीक्षा व मूल्यमापन मंडळाची बैठक होणार आहे. कुलगुरु डॉ. डी. टी.शिर्के यांच्या प्रमुख उपस्थितीत बैठक होणार आहे. या बैठकीत परीक्षा पुढे ढकलण्याचा निर्णय होण्याची शक्यता आहे. त्यामुळे परीक्षेत लागणारे सॉफ्टवेअर खरेदी नंतरच सर्वसाधारण १६ ऑक्टोबर नंतरच परीक्षा होणार असल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक गजानन पळसे यांनी दिली.

शिवाजी विद्यापीठातील पदवी अंतिम सत्राच्या परीक्षा १० ऑक्टोबर पासून सुरु होणार होत्या. परंतु कर्मचाऱ्यांच्या लेखणी बंद आंदोलनामुळे परीक्षा पुढे ढकलण्यात संदर्भात परीक्षा मूल्यमापन मंडळाकडे शिफारस केली जाणार आहे.

,आरोग्य विभागाच्या पथकांच्या माध्यमातून नागरिकांची तपासणी करण्यात आली. सर्वेमध्ये स्वयंसेवक अशा १५ आरोग्य कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला.

राज्यात कायमच चर्चेत असलेल्या माळेगाव कारखान्याच्या ऊस उत्पादकांसाठी यंदा तावरे गट लढा देणार का? या चर्चेला धुराडे पेटण्यापूर्वीच सुरूवात झाली आहे.

आक्रमकता नसल्याचे ऊस उत्पादकांचे म्हणणे आहे.

■ दौंड येथील कारखाना शक्यतो बंदच असतो. ज्यावेळी होतो. त्यावेळी विरोधक जागे होतात. त्यामुळे जिल्ह्यात उत्पादकांच्या प्रश्नासाठी भांडण्यासाठी तसा विरोधकच नसल्याची खंत ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी मांडली आहे.

■ देशातील साखर उद्योग अनिश्चिततेच्या गर्तेत असण्या अनेक कारणे आहेत. नैसर्गिक परिस्थिती, साखरेचे

# डी. टी. शिर्के यांनी कुलगुरुपदाची सूत्रे स्वीकारली

## प्रभारी कुलगुरू डॉ. करमळकर यांना निरोप

नवराष्ट्र न्युज नेटवर्क

**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठाचे नवनियुक्त कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांनी बुधवारी सायंकाळी प्रभारी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांच्याकडून कुलगुरू पदाची सूत्रे स्वीकारली. डॉ. डी.टी. शिर्के यांनी सायंकाळी विद्यापीठाच्या प्रांगणातील छत्रपती शिवरायांच्या पुतळ्यास कुटुंबियांसमवेत अभिवादन केले.



### डॉ. करमळकर यांचा गौरव

विद्यापीठाच्या प्रांगणातील कर्मवीर भाऊराव पाटील, विद्यापीठाचे प्रथम कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार, शिक्षणमहर्षी बापूजी साळुंखे यांच्या पुतळ्यांना नूतन कुलगुरूंनी सायंकाळीच अभिवादन केले. त्यांच्यासमवेत पत्नी सुनिता आणि मुलगी श्रद्धा उपस्थित होत्या. डॉ. करमळकर यांनी डॉ. शिर्के यांचे स्वागत केले. त्यानंतर कुलगुरूंच्या दालनामध्ये नूतन कुलगुरूंकडे सूत्रे प्रदान करण्याची प्रक्रिया पार पाडण्यात आली.

कार्यभाराच्या पत्रांचे हस्तांतरण व ज्ञानदंड स्वीकारून डॉ. शिर्के यांनी प्रभारी कुलगुरू डॉ. करमळकर यांच्याकडून शिवाजी विद्यापीठाचे तेरावे कुलगुरु म्हणून पदभार स्वीकारला. कार्यभार स्वीकारल्यानंतर विद्यापीठाशी संबंधित विविध घटकांकडून नूतन कुलगुरूंनी सुहास्य वदनाने शुभेच्छांचा स्वीकार केला. या प्रसंगी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक जी.आर. पळसे, वित्त व लेखाधिकारी व्ही.टी. पाटील, विद्यार्थी कल्याण संचालक डॉ. आर.व्ही. गुरव उपस्थित होते.

प्रभारी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी शिवाजी विद्यापीठाच्या अल्प प्रभारी कुलगुरू पदाच्या कार्यकाळात शांत, समंजस व संयमी कारभाराचे प्रत्यंतर आले. त्यामुळे त्यांची अल्प कारकीर्दही संस्मरणीय ठरली, अशा शब्दांत कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांनी डॉ. करमळकर यांचा गौरव केला. प्रभारी कुलगुरू डॉ. करमळकर यांना निरोप देण्यात आला.

का

न

मंचर
असल्याने
महसूलच
नसल्याने
नागरिकां
तसेच प्र
फेरफार
लावत अ
व मंडल
त्रास होत
त्वरित
तलाठी
यांना अ
याबाबतचे
यांना देण्य

# आढळा नदीचे पाणी पाइपलाइनद्वारे चिकणीत दाखल

## पाणी पोहोचल्याने अनेक गावांना मिळणार लाभ

नवराष्ट्र न्युज नेटवर्क

**अहमदनगरः** महाराष्ट्राचे महसूल मंत्री बाळासाहेब थोरात व आमदार डॉ.सुधीर



# जेइइ एडवांस 'एलन'चे वि

नवराष्ट्र न्युज नेटवर्क

**पुणे.** जेइइ एडवांस्ड प्रवेश परीक्षेत एलन करियर इंस्टीट्यूटच्या विद्यार्थ्यांनी पुन्हा एकदा आपली योग्यता सिद्ध केली आहे. पुण्यातील इंस्टीट्यूटचे प्रमुख अरूण जैन यांनी सांगितले की, जेइइ एडवांस्ड प्रवेश

■ इंस्टी लागल इंस्टीट महेश्वर एडवांस्ड असते.

पना कर्तव्य निभाने
व्हाण, संभाजी शिंदे,
सलीम मुजावर, अंजुम
न मोरे, फार्मासिस्ट
कास मोरे, स्वप्निल
कांत खंडागले, काकडे
फाई कर्मचारी राजू इन
भी को विशेष सम्मान पत्र
से सम्मानित किया
गया. इस समय
राहुल चव्हाण,
संभाजी शिंदे, पोपट
जाधव आदि
उपस्थित थे.




पुणे. खूबसूरत फूल पर बैठे मधुमक्खी के नजारे को कैद किया है फोटोग्राफर सुशील राठौड़ ने.

### शिवाजी विश्वविद्यालय के नवनियुक्त कुलगुरू

# डॉ. डी. टी. शिर्के ने संभाला पदभार

नवभारत न्यूज नेटवर्क

कोल्हापुर. ने शिवाजी विश्वविद्यालय के नवनियुक्त कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के अपने पद पर आसीन हो गए हैं. उनका पदग्रहण समारोह हाल ही में विश्वविद्यालय में हुआ. प्रभारी कुलगुरु डॉ. नितिन करमलकर से उन्होंने पदभार स्वीकार किया.



## महान हस्तियों का अभिवादन किया

■ पद स्वीकार करने के बाद डॉ. शिर्के ने विश्वविद्यालय के प्रांगण में स्थित छत्रपति शिवाजी महाराज की प्रतिमा का अभिवादन किया. साथ में कर्मवीर भाऊराव पाटिल, विश्वविद्यालय के प्रथम कुलगुरु डॉ. अप्पासाहब पवार, शिक्षा महर्षि बापू सालुंखे की प्रतिमाओं को नमन किया. डॉ. शिर्के के साथ उनकी पत्नी सुनीता, बेटी श्रद्धा भी उपस्थित थीं.

■ डॉ. करममलकर ने डॉ. शिर्के का स्वागत किया. पदभार के पत्र का हस्तांतरण तथा ज्ञानदंड स्वीकारते हुए डॉ. शिर्के ने अपने पद को स्वीकार किया. पदभार स्वीकार करने के बाद विश्वविद्यालय से संबंधित विभिन्न विभागों के अधिकारियों की शुभकामनाओं का स्वीकार किया. इस समय कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा एवं मूल्यांकन मंडल के प्रभारी संचालक जी. आर. पलसे, वित्त एवं लेखाधिकारी वी. टी. पाटिल, छात्र कल्याण संचालक डॉ. आर. वी. गुरव समेत प्रबंधन परिषद, विद्या परिषद एवं अधिसभा के सदस्य उपस्थित थे.

## प्रभारी कुलसचिव डॉ. करमलकर की हुई विदाई

प्रभारी कुलगुरु डॉ. नितिन करमलकर को इस समय विदाई दी गई. पिछले कुछ समय से वे प्रभारी कुलगुरु के तौर पर कामकाज देख रहे थे. उन्होंने अपने कार्यकाल में विश्वविद्यालय के विकास के लिए काफी प्रयास किए. नवनियुक्त कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के ने डॉ. करमलकर के कार्य का सम्मान कर उनके कार्य के लिए धन्यवाद व्यक्त किया.